



दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

VADAL VARTA






vadalvartanews@gmail.com

●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले ●कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७



● बीड/महाराष्ट्र ● शनिवार २ मार्च २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक १९९ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये


# होय, मी प्रो-ओबीसी आहे: देवेंद्र फडणवीस असं का म्हणाले?


**मराठ्यांसाठी मी जेवढे निर्णय घेतले तेवढे कुणी घेतले दाखवा. मराठा तरुणांसाठी सारथी संस्था, वसतीगृहाची व्यवस्था, वसतीगृह भत्ता, अण्णासाहेब पाटील महामंडळ अशा अनेक योजना जाहीर केल्या**

## राजकारणात आपण कायम प्रो-ओबीसी राहीलो एवढाच काय तो माझा आणि छगन भुजबळ यांच्यातील समान धागा आहे.

वादळवार्ता]
लोकसभा निवडणूकीचे वारे सर्वत्र वाहू लागले असताना एकीकडे जागा वाटपाच्या यादीवरुन अंतिम हात फिरविला जात असतानाच दुसरीकडे महाराष्ट्रात पक्ष फोडाफोडीमुळे राजकारण तापले आहे. यातच यंदाच्या लोकसभा निवडणूका या चार प्रमुख पक्षांऐवजी सहा पक्षांमध्ये लढविल्या जाणार आहेत. त्यामुळे निवडणूकांमध्ये काटे की टक्कर होणार आहे. या पार्श्वभूमीवर टीव्ही 9 मराठीच्या महासंग्राम लोकसभेचा या कार्यक्रमात राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुलाखत टीव्ही 9 मराठीचे व्यवस्थापकीय



संपादक उमेश कुमावत यांनी घेतली. या मुलाखतीत देवेंद्र फडणवीस यांनी भाजपात प्रवेश केलेल्या मोठ्या नेत्यासंदर्भात आपली मते स्पष्ट मते मांडलीच तसेच आपल्या राजकारणात आपण कायम प्रो-ओबीसी राहील्याचेही सांगितले. मराठ्यांना आरक्षण मी मुख्यमंत्री असताना दिले आणि ती हायकोर्टातही टीकले, तसेच मी मुख्यमंत्री असेपर्यंत सर्वोच्च न्यायालयातही ते टीकविल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले. आघाडी सरकारला ते टीकविता आले नाही. आता आमच्या सरकारचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठ्यांना 10 टक्के आरक्षण दिले असल्याचे त्यांनी सांगितले. मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण देण्याची मागणी जरांगे पाटील यांनी केली होती. यावर बोलताना ते म्हणाले की मराठ्यांना ओबीसीत टाकले असते तर मनभेद झाले असते. आरक्षण वाढले नसते. जेवढे ओबीसी आरक्षणात आहेत, तेवढेच मराठा ओबीसी आरक्षणात आले असते. कुणाच्याच वाट्याला काही आलं नसतं असे त्यांनी स्पष्ट केले. ते पुढे म्हणाले की जे मायक्रो ओबीसी आहेत, ओबीसीतील मोठे घटक आणि मराठा समाज यांना फायदा झाला असता. पण छोट्या ओबीसी घटकांना त्यात ओबीसीतील 300 छोट्या जाती आहेत. त्यांना न्याय मिळाला नसता, सामाजिक न्याय देण्याऐवजी सामाजिक अन्याय झाला असता. हा कॉन्शस निर्णय होता. ओबीसींनाही न्याय दिला पाहिजे आणि मराठा समाजालाही न्याय दिला पाहिजे, असा न्याय तत्त्वावर हा निर्णय घेतल्याचे फडणवीस यांनी सांगितले. भुजबळ तुमचा माणूस आहे



का ? असा सवाल केला जात आहे. त्यावर देवेंद्र फडणवीस म्हणाले की भुजबळ कुणाचा माणूस म्हणता येईल का? मी राजकारणात येण्याच्या आधीपासून ते राजकारणात आहेत. मी 1989 ला आलो. ते 85 मध्ये महापौर होते. काही बाबतीत भुजबळांचा इतिहास पाहिला तर भुजबळांचं शिवसेनेसोबत भांडण का झालं ? शिवसेनेला मंडल आयोग मान्य नव्हतं. मंडल आयोगासाठी त्यांनी शिवसेना सोडली. ते काँग्रेससोबत गेले होते असे फडणवीस यांनी सांगितले

### मी प्रो-ओबीसी पण...

माझ्या राजकारणाच्या पहिल्या दिवसापासून मी ओबीसींच्या बाजूने आहे. माझं ठाम मत आहे की सामाजिक न्याय करायचा असेल तर जसं शेड्यूल कास्ट आणि शेड्यूल ट्राईब यांना न्याय दिल्याशिवाय 'सामाजिक न्याय' होऊ शकत नाही. तसंच ओबीसींना न्याय दिल्याशिवाय 'सामाजिक न्याय' होऊ शकत नाही. आजही तुम्ही बघा ओबीसीतील बारा बलुतेदारांची अवस्था पाहा. त्यातील छोट्या जातींची अवस्था पाहा. त्यांची अवस्था आणि अनुसूचित जातीतील लोकात फार थोडा फरक आहे. त्यामुळे मी पहिल्या दिवसापासून... महाराष्ट्रात नॉन क्रिमिलियरसाठी संघर्ष केला. क्रिमिलियरची मर्यादा 8 लाखावरून अडीच लाख केली. मी संघर्ष करून ती वाढवून घेतली. भुजबळ आणि माझ्यात हीच समानता आहे, ते म्हणजे मी प्रो -ओबीसी राहिलो. ओबीसींच्या बाजूने राहिलो म्हणजे परंतू मी अँटी मराठा नव्हतो असेही देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. मराठ्यांसाठी मी जेवढे निर्णय घेतले तेवढे कुणी घेतले दाखवा. मराठा तरुणांसाठी सारथी संस्था, वसतीगृहाची व्यवस्था, वसतीगृह भत्ता, अण्णासाहेब पाटील महामंडळ अशा अनेक योजना जाहीर केल्या आणि आता एकनाथ शिंदे यांनी मराठ्यांसाठी योग्य निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले.

## पिंपळे सौदागर रहाटणी विभाग संघटनेच्या अध्यक्षपदी शुभम तवर यांची बिनविरोध निवड

वादळवार्ता/पिंपरी चिंचवड
पिंपरी चिंचवड शहर लॉन्ड्री संघटनेच्या अंतर्गत पिंपळे सौदागर रहाटणी विभागाची जम्बो कार्यकारणी जाहीर करण्यात आली. शहराध्यक्ष सुनील पवार व कार्याध्यक्ष भाई विशाल जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपळे सौदागर हनुमान मंदिर येथे मासिक सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बोलताना भाई विशाल जाधव म्हणाले की लॉन्ड्री संघटनेच्या सभासदांना कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण झाल्यास ,त्यांनी संघटनेला रीतसर पत्र व्यवहार केल्यास त्या लॉन्ड्री धारकांची अडचण सोडवण्यात येईल. लॉन्ड्री व्यवसाय चालकाने एकाच दरात व्यवसाय करावा. संघटनेचे नियमाचे व शर्तीचे प्रत्येकाने पालन करावे ,अन्यथा संघटनेमार्फत दंडात्मक कारवाई करण्यात येईल. लॉन्ड्री संघटनेमार्फत वर्षातून तीन सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात येते, त्यामध्ये महापुरुषांची संयुक्त जयंती ,समाजातील विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तींचा पुरस्कार सोहळा,



पिंपरी चिंचवड शहर महापुरुषांचे पुतळे व मंदिरांची साफसफाई करणे ,असे उपक्रम संघटनेमार्फत राबविले जातात. नवीन कार्यकारणीतील पदाधिकारी यांचे अभिनंदन व शुभेच्छा आपण सर्वांनी अधिक ताकतीने संघटन मजबूत करावे असे मत जाधव यांनी व्यक्त केले. निवड झालेली कार्यकारणी पुढील प्रमाणे अध्यक्ष: शुभम तवर उपाध्यक्ष:परमेश्वर पैठणकर खजिनदार: विक्रम जाधव सचिव :स्वप्निल इंगोले कार्यकारणी सदस्य:सागर राठोड संतोष परीट ,राजकुमार, कनोजिया,अमोल मोरे,संतोष सौदागर ,दत्ता सौदागर ,ज्ञानेश्वर मुळे ,सुशील काटे ,सुरज राक्षे संतोष गोतावळे, बबलू खान आदिची निवड करण्यात आली.

## अहिल्यादेवी होळकर घरकुल योजनेचा पहिला हप्ता आचारसंहितेपूर्वी जमा करावा- सरपंच दत्ता किवने

**वादळवार्ता/बीड** \शासनाने भटक्या जमाती व धनगर समाजातील गरीब लाभधारकांना स्वतःचे घर मिळण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर व यशवंतराव होळकर घरकुल योजना सुरू केली आहे बीड जिल्ह्यातील गाव वाड्या वस्त्या मधील लाभधारकांनी घरकुल योजनेचे प्रस्ताव पंचायत समिती अंतर्गत जिल्हा समाज कल्याण विभाग बीड यांच्याकडे पाठवले आहेत लोकसभा निवडणुक आचारसंहिता सुरू होण्यापूर्वी संबंधित घरकुलाचा निधी उपलब्ध करून लाभधारकाच्या खात्यात पहिला हप्ता जमा करावा अशी मागणी बीड तालुक्यातील पिंपळा देवीचे सरपंच युवा नेते दत्ता बाबासाहेब किवने यांनी जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे याबद्दल अधिक माहिती



अशी की शासनाने भटक्या जमाती व धनगर समाजातील गरीब बेघर लोकांसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना सुरू केली आहे . जिल्ह्यातील गाववाड्यावरील लाभधारकांनी घरकुलाची प्रस्ताव पंचायत समिती अंतर्गत समाज कल्याण विभाग बीड यांच्याकडे प्रस्ताव जमा केले आहेत सदरील घरकुलाचा निधी मंजूर करून लोकसभा निवडणूक आचारसंहिते पूर्वी लाभधारकांच्या खात्यात पहिला हप्ता जमा करावा अशी मागणी धनगर समाजाच्या वतीने पिंपळादेवीचे सरपंच तथा युवा नेते दत्ता बाबासाहेब किवने यांनी जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांच्या कडे केली आहे .

## परळी औष्णिक विद्युत केंद्रातील चिमणी जमीनदोस्त

**दैनिक वादळ वार्ता**
**परळी वैजनाथ/ परवेज पटेल**

मराठवाड्यातील एकमेव औष्णिक विद्युत केंद्र असलेल्या परळी जिल्हा बीड येथील औष्णिक ऊर्जा प्रकल्पाच्या संच क्रमांक चारची धूरवाहक चिमणी आज जमीनदोस्त करण्यात आली. परळीच्या औष्णिक विद्युत केंद्राचे प्रतीक बनलेल्या तीन धुराच्या चिमण्यांपैकी एक चिमणी सप्टेंबर २०२२ मध्ये जमीनदोस्त करण्यात आली होती. आज सकाळी संच क्रमांक चारची चिमणी जमीनदोस्त करण्यात आली आहे. १२० मिटर उंचीची असलेली ही चिमणी आज सकाळी नऊ वाजता जमीनदोस्त करण्यात आली. मराठवाड्यातील पहिले औष्णिक विद्युत केंद्र परळी येथे सन १९७१ मध्ये सुरु झाले. धूर वाहण्यासाठी तीन चिमण्या निर्माण करण्यात आलेल्या आहेत. या तीन चिमण्या परळीच्या औष्णिक विद्युत केंद्राचे प्रतीक बनल्या होत्या. सद्यस्थितीला परळी येथे एकूण आठ संच निर्माण करण्यात आलेले आहेत. त्यापैकी संच क्रमांक एक, दोन, तीन हे बंद करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. संच क्रमांक तीन, चार व पाच हे संच आयुर्मान संपल्यामुळे निर्णय घेण्यात आलेला आहे. या संचांच्या जागेवर सौर ऊर्जा प्रकल्प उभारला जाणार आहे. यामध्ये संच क्रमांक तीन पूर्णतः अवसायनात काढण्याची प्रक्रिया सप्टेंबर २०२२ मध्येच पुर्ण करण्यात आली आहे. आता संच चार मधील सर्व यंत्रणा व या संचाच्या संबंधित सर्व विभाग हे एक एक करून नाहीसे करण्यात येत आहेत. आज टप्प्यात संच क्रमांक चार ची धुरवाहक चिमणी जमीनदोस्त करण्यात आली आहे. २१० मेगावॅट क्षमतेचा संच क्रमांक चार ३१|२१९८७ मध्ये सुरू करण्यात आला होता. हा संच आता संपूर्णतः बंद करण्यात आलेला आहे. २०१० मेगावॉट क्षमतेचा संच क्रमांक ४ चे आयुर्मान संपल्याने राज्य वीज निर्मिती कंपनीने हा संच स्क्रॅप मध्ये काढला आहे. आयुर्मान संपल्याने २०१५ पासून हा संच बंद ठेवण्यात आला होता त्यानंतर सन २०१९ पूर्वी हा संच स्क्रॅप मध्ये काढण्याचा निर्णय घेण्यात आला यापूर्वी महाजनकोने परळी औष्णिक उद्योग केंद्रातील ३० मेगावॉटचे दोन संच स्क्रॅच मध्ये काढलेले आहेत. विद्युत केंद्रातील संच क्रमांक तीन, चार पाच हे तीन संच २०१९ पासून बंद आहेत. त्यापैकी संच क्रमांक चार ची १८० मी. उंचीची चिमणी आज सकाळी पाडण्यात आली आहे. यावेळी विद्युत केंद्राच्या अधिकारी सुरक्षा विभागाचे कर्मचारी, कन्स्ट्रक्शन विभागाचे कर्मचारी उपस्थित होते



## संपादकीय

# होमगार्ड संघटना!

जागतिक नागरी संरक्षण दिन दरवर्षी १ मार्च रोजी साजरा केला जातो. जगातील नागरी संरक्षण, नागरी संरक्षण, नागरी सुरक्षेबाबत लोकांना जागरुक करणे हा त्याचा उद्देश आहे. इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन फॉर सिव्हिल डिफेन्स (आईसीडीओ) ही एक आंतरशासकीय संस्था आहे ज्याचा उद्देश नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्तींच्या प्रसंगी लोकसंख्येचे संरक्षण करणे आणि त्यांना मदत करणे आणि मालमत्ता आणि पर्यावरणाचे संरक्षण सुनिश्चित करणाऱ्या संरचनेच्या राज्यांद्वारे विकासात योगदान देणे आहे. तसेच या दिवशी विविध राष्ट्रीय कार्यक्रम या दिवशी आयोजित केले जातात. अशी रोचक माहिती श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींच्या सदर लेखातून जाणून घेउया... संपादक.

देशातील नागरिकांचे जीवित, मालमत्ता तसेच नागरी संस्था, उद्योगधंदे, वसाहती इत्यादींचे संरक्षण करण्यासाठी नागरिकांच्या स्वयंस्फूर्त सहभागाने व शासकीय साहाय्याने उभारलेली व्यवस्था म्हणजे नागरी संरक्षणव्यवस्था होय. १ मार्च हा जगभरात जागतिक नागरी संरक्षण दिन म्हणून पाळण्यात येतो. शत्रूच्या सैनिकी, घातपाती, प्रचारकी वा तत्सम स्वरूपाच्या आक्रमक आणि विध्वंसक कृत्यांनी देशातील नागरी जीवनाची हानी होऊ शकते. त्याचप्रमाणे राष्ट्रांतर्गत घातपाती कारवायांमुळेही देशातील कायदा व सुव्यवस्था बिघडून नागरी जीवन विस्कळित होऊ शकते. म्हणून आधुनिक काळात नागरी संरक्षण हे राष्ट्राच्या एकूण संरक्षणनीतीचाच एक अविभाज्य असा घटक मानला जातो. नागरी संरक्षणाची पारंपरिक कल्पना ही केवळ प्रतिबंधक उपायांपुरतीच मर्यादित असल्याचे दिसते, तर शत्रूचे आक्रमण आणि विध्वंसक कारवाया यांपासून नागरिकांना झळ पोचू नये या हेतूने प्रतिकारात्मक व प्रतिबंधक अशी दुहेरी व्यवस्था आधुनिक काळात केली जाते. गावाला तटबंदी घालणे हा नागरी संरक्षणाचा एक जुना प्रकार होय. आधुनिक काळात आक्रमणाचे, युद्धाचे आणि देशांतर्गत संघर्षाचे स्वरूप आमूलाग्र बदल्यामुळे नागरी संरक्षणाच्या कल्पनेतही बदल झालेला आहे.

नागरी म्हणजे बिनलष्करी लोकांचे संरक्षण, ही कल्पना आधुनिक काळातील नसून तिचे मूळ प्राचीन काळात सापडते. गावाला तटबंदी घालणे हा प्राचीन काळी सर्वत्र आढळणारा प्रकार नागरी संरक्षणाचाच एक भाग होता. हिंदुस्थानात तथाकथित उच्चवर्णीय लोकांनाच तटबंदीयुक्त नगराच्या आत वस्ती करता येत असे. संकटकाळी मात्र याच तटांच्या आत सर्वांना आश्रय मिळे. अठराव्या शतकापासून युद्धाचे स्वरूप बदलत गेले. ते केवळ रणांगणापुरतेच मर्यादित न राहता नागरी वस्तीपर्यंत फैलावले. नागरिकांवर सतत हल्ले केले, तर नागरिक शेवटी कंटाळून आपल्या राजकर्त्यास शरणागती पत्करण्यास भाग पाडतील, अशी विचारसरणी प्रभावी ठरली. नागरी संरक्षणाचे महत्त्व ओळखून भारत सरकारने ही संघटना उभारली आहे. नागरी संरक्षणाच्या योजना, उपाय व साधने यांसाठी मध्यवर्ती सरकारचे गृहमंत्रालय जबाबदार असून त्यासाठी केंद्रात नागरी संरक्षण प्रसंचालक व त्याचे कार्यालय आहे. प्रसंचालक लेफ्टनंट जनरल या श्रेणीचा सैनिकी अधिकारी असतो. राज्यपातळीवरही नागरी संरक्षण संघटना असून त्यांची संचालयीन कार्यालये असतात. संरक्षण, टपाल व तार, रेल्वे, नागरी व औद्योगिक संस्था यांचे प्रतिनिधी असलेल्या नागरी संरक्षण समित्या प्रत्येक राज्य व जिल्हापातळीवर नेमलेल्या असतात. तसेच मोठ्या शहरात व गावात नागरी संरक्षण दले उभारण्यात आली असून त्यांत कोणाही नागरिकास स्वयंसेवक म्हणून भरती होता येते.

गावाचे पेठावार भाग पाडून त्यांत ठिकठिकाणी वॉर्डन पोस्ट व प्रथमोपचार केंद्रे असतात. स्वयंसेवकांना गस्त घालणे, प्रथमोपचार करणे, आग विझविणे, संकटग्रस्तांची सुटका करणे, वाहतुकीचे नियंत्रण करणे इ. गोष्टींचे प्रशिक्षण दिले जाते. मध्यवर्ती सरकारने नागपूर येथे राष्ट्रीय नागरी संरक्षण महाविद्यालय स्थापन केले आहे. तेथे नागरी संरक्षणाचे उच्च शिक्षण दिले जाते. राष्ट्रीय अग्निशामक सेना महाविद्यालयात अग्निशामक सेवेचे उच्च शिक्षण देण्यात येते. १९७३ अखेर एकूण ४ लक्ष ४ हजार स्वयंसेवक नागरी संरक्षण दलात होते. मध्यवर्ती सरकाराकडून सन १९७३ अखेर २९ लक्ष रुपयांचे अनुदान राज्यांना मिळाले. नागरी संरक्षण संघटनेला पूरक अशी होमगार्ड संघटना प्रत्येक राज्यात काम करते. !! विश्व नागरी संरक्षण दिनाच्या सर्व बंधुभगिनींना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

**-संकलन व सुलेखन-**
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सअ‍ॅप-**

# विविधांगी भुमिकातून जोरकसपणे नेतृत्व!

(जागतिक वन्यजीव दिन विशेष.)

वन्यजीवांचे संरक्षणासह नागरिकांमध्ये त्याबाबत जागृती करण्याच्या उद्देशाने संयुक्त राष्ट्र संघाच्या थायलंड येथील सभेत जागतिक वन्यजीव दिन साजरा करण्याचे घोषित करण्यात आले. त्यानंतर आजतागायत ३ मार्च हा जागतिक वन्यजीव दिन म्हणून साजरा करण्यात येतो. पृथ्वीवर असलेल्या प्रत्येक जीवाला जगण्याचा अधिकार आहे. मात्र काही विकृतांकडून पृथ्वीवरील दुर्मीळ वृक्ष, दुर्मीळ प्राणी, झाडांच्या प्रजातींची तस्करी करण्यात येते. याला आळा घालण्यासाठी जागतिक पातळीवर प्रयत्न करण्यात आले. महत्वपूर्ण व ज्ञानवर्धक माहिती श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींच्या या संकलित लेखातून वेचून घ्यावी... संपादक.

संयुक्त राष्ट्राच्या महासभेने सन २०१३ला यासाठी विश्व वन्यजीव दिवस ३ मार्चला घोषित केला. त्यानुसार दरवर्षी जागतिक वन्यजीव दिन साजरा करण्यात येतो. पृथ्वीवरील प्रत्येक वन्यजीवाला मानवासारखाच राहण्याचा आणि जगण्याचा अधिकार असल्याचे या दिवसातून पटवून देण्यात येते. दरवर्षी ३ मार्चला जागतिक वन्यजीव दिन साजरा करण्याची सुरूवात थायलंडपासून करण्यात आली. पृथ्वीवर असलेल्या जंगली जीवांना मुक्तपणे संचार करण्याचा आणि त्यांच्या हक्काबाबतची जागरुकता वाढवण्याबाबत या जागतिक वन्यदिनातून पटवून देण्यात आले. वन्य जीवांचे अनुवांशिक, वैज्ञानीक, सौंदर्यासहीत विविध बाबतींच्या अभ्यासाला चालना देण्याचे धोरणही यावेळी पटवून देण्यात आले. त्यामुळे थायलंडमधील बँकॉक येथे झालेल्या पहिल्या वन्यजीव दिनापासून ते आजपर्यंत जागतिक वन्यदिनाला संयुक्त महासभा विविध थीम घेऊन कार्य करते. जागतिक वन्यजीव दिनाची पार्टनरशीप फॉर वाईल्ड लाईफ कंझर्वेशन ही थीम असल्याचे संयुक्त राष्ट्रसंघाच्या वतीने घोषीत करण्यात आले आहे. पृथ्वीवर असलेल्या वन्यजीवांचे संरक्षण करण्यासाठी विश्व वन्यजीव दिन साजरा करण्यात येतो. यासाठी दरवर्षी संयुक्त राष्ट्र संघाकडू एक थीम घेऊन त्यावर काम करण्यात येते. त्यासह नागरिकांमध्ये जनजागृतीही करण्यात येते. संयुक्त राष्ट्रसंघाने जागतिक वन्यजीव दिन घोषित केल्यापासून आतापर्यंत विविध थीम घेऊन काम करण्यात आले आहे. सन २०१५मध्ये वन्यजीवांच्या गुन्ह्यांविरोधात गंभीर होण्याची गरज असल्याची थीम घेऊन काम करण्यात आले. संयुक्त राष्ट्र संघाने सन २०१६मध्ये वन्यजीवांचे भविष्य आपल्या हातात असल्याची थीम घेऊन काम केले. सन २०१७मध्ये संयुक्त राष्ट्र संघाने "युवकांनो' आवाज ऐका!" अशी थीम घेऊन काम केले आहे. सन २०१८ला संयुक्त राष्ट्र संघाने मांजरांच्या प्रजातीतील वन्यजीव धोक्यात असल्याची थीम घेऊन त्यावर जनजागृती केली. सन २०१९ला नागरिक आणि ग्रहांसाठी पाण्याच्या खाली जीवन अशी थीम घेऊन संयुक्त राष्ट्राने जनजागृती केली, तर सन २०२०ला पृथ्वीवर जीवन कायम ठेवणे, ही थीम घेऊन काम केले. यावर्षी वन्यजीव संरक्षणासाठी योगदान, अशी थीम घेऊन संयुक्त राष्ट्रसंघ जनजागृती करत आहे.

जागतिक पातळीवरील नागरिकांचे जीवन जल आणि जंगलावर अवलंबून आहे. मात्र तरीही अनेक जंगली प्राण्यांच्या आणि वन संपती तस्करी करण्याच्या घटना घडत होत्या. त्याला आळा घालण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाने दि.३ मार्च १९७३ला वन्यजीव आणि वनस्पतीच्या व्यापाराला रोखण्यासाठी करारावर सही केली होती. त्यानंतर थायलंडमधील बँकॉक येथे संयुक्त राष्ट्र संघाचे अधिवेशन दि.२० डिसेंबर २०१३ला आयोजित करण्यात आले होते. या अधिवेशनात वन्यजीवांच्या तस्करीला रोखण्यासाठी आणि त्याबाबत जनजागृती करण्यासाठी हा जागतिक वन्यजीव दिन म्हणून साजरा करण्याचे ठरवण्यात आले. तेव्हापासून हा जागतिक वन्यजीव दिन म्हणून साजरा करण्यात येतो. एखाद्या विशिष्ट भूभागात वन्यजीवांच्या एकूण संख्येपैकी विविध प्रजातींच्या पैदासक्षम प्राण्यांची सरासरी संख्या त्यांचे नैसर्गिक परिसंस्थेतील अस्तित्वदर्जा ठरवतात. धोक्याच्या पातळी बाहेर, संकटग्रस्त, नामशेष प्रवण, नष्ट अशा विविध प्रवर्गात वर्गवारी करता येईल. त्यानुसार दुर्मिळ वन्य प्रजातींना संरक्षण देण्याचे काम कायद्यान्वये वन विभागामार्फत केल्या जाते. विविध निसर्ग अभ्यासक, शास्त्रज्ञ यांचे संशोधनातून संरक्षण पद्धतीचे नियोजन करण्यास मदत होते. आईयूसीएन या निसर्ग संवर्धनाचे काम करणाऱ्या एका आंतरराष्ट्रीय संस्थेच्या अहवालनुसार भारतात आजमितीला एकूण १७२ प्रजाती संकटग्रस्त आहेत. यात सस्तन प्राण्याच्या ५३, पक्ष्यांच्या ६९, सरीसृप २३ आणि उभयचर प्राण्यांच्या ३ प्रजातींचा समावेश होतो. पट्टेरी भारतीय वाघ, सिंह, जंगली मांजर, काश्मिरी काळवीट, राजहंस, माळढोक, कासव असे अनेक वन्यपशुपक्षी संकटग्रस्त आहेत. त्यासाठी वन्य पक्षी संरक्षण कायदा- १८८७, हत्ती जतन कायदा- १८७९, भारतीय मत्स्य कायदा- १८९७, भारतीय वन कायदा- १९२७, बॉम्बे वन्य पशू व वन्य पक्षी संरक्षण कायदा- १९५१, प्राणी क्लेश प्रतिबंधात्मक कायदा- १९६०, वन्यजीव संरक्षण राष्ट्रीय प्रणाली- १९७०, वन्यजीव संरक्षण कायदा- १९७२ सुधारित १९९१, भारतीय जैवविविधता कायदा- २००२ याप्रमाणे आहेत. भारतीय वन्यजीवांच्या संरक्षणार्थ शासकीय आणि बिगरशासकीय पातळीवर अनेक अंगांनी प्रयत्न केले जात आहेत. अवैध शिकार, जंगलतोड, तस्करी यांना आळा घालण्यासाठी संवैधानिक कायदे व नियम केल्या गेले आहेत. सन १९७२मध्ये अस्तीत्वात आलेला वन्यजीव संरक्षण कायदांतर्गत राष्ट्रीय वन्यजीव उद्याने एकूण १०४, वन्यजीव अभयारण्ये एकूण ५४३, व्याघ्र प्रकल्प, पक्षी अधिवास यांच्या माध्यमातून वन्यजीवांना अभय देण्यात येत आहे. तसेच प्रोजेक्ट टायगर- १९७३, प्रोजेक्ट एलिफंट- १९९३, ईको डेवलपमेंट प्रोजेक्ट, सुसर पैदास प्रकल्प- १९७५ अशा विशिष्ट प्रकल्पांतून अति संकटग्रस्त प्राण्यांना विशेष संरक्षण दिल्या जाते. भारतीय वन्यजीव संस्था, डेहराडून व संकटग्रस्त प्रजातीसाठी संवर्धन प्रयोगशाळा- सीसीएमबी, हैदराबाद सारख्या शासकीय संस्थेसह वर्ल्ड वाइल्डलाइफ फंड, वाइल्डलाइफ ट्रस्ट ऑफ इंडिया, बीएनएचएस अशा अनेक नामांकित बिगरशासकीय संस्था संशोधन आणि लोकप्रबोधनाचे महत्वाचे काम करत आहेत. याशिवाय भारतात विविध शहरात असलेल्या वन्यप्राणी संग्रहालयाच्या, सर्पोद्यान माध्यमातून जनसामान्यात जनजागृतीचे कार्य केल्या जाते आ हे .

महाराष्ट्रात वन्यजीवांच्या संरक्षणार्थ राष्ट्रीय उद्याने एकूण ५- संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली, पेंच, ताडोबा, नवेगाव, गुगामल, व्याघ्र प्रकल्प एकूण ४- मेळघाट, ताडोबा- अंधेरी, पेंच, सह्याद्री, अभयारण्य एकूण ३२ संरक्षित क्षेत्रे आहेत. वन्यजीवांच्या संरक्षणात पशुवैद्यक क्षेत्राची भूमिका महत्वाची असून वन्य प्राण्यांचे रोगनिदान, औषधोपचार, लसीकरण, भूल, शवविच्छेदन, फॉरेन्सिक चाचण्या अशा विविध प्रसंगी तज्ञ पशुवैद्यक असणे जसे गरजेचे आहे तसे विविध भागातील वन्यजीव संपदेचे संरक्षण करण्यासाठी शास्त्रीय पद्धतीने पशुगणना, प्रजनन आणि आनुवंशिकता लक्षात घेत पैदास व्यवस्थापन, संसर्गजन्य रोगाचे प्रतिबंधात्मक उपाय आणि वन्यजीव व्यवस्थापन करण्याहेतू पशुवैद्यकांचे शास्त्रीय दृष्टीकोन इतर जीवशास्त्रज्ञांच्या समवेत योजनाबद्ध नियमावली करण्यासाठी दिशादर्शक ठरू शकतात. राज्य शासनाच्या वन विभाग आणि महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपुर यांचे संयुक्त प्रयत्नातून गोरेवाडा, नागपुर येथे साकारलेले "ट्रांजिट ट्रीटमेंट सेंटर" तसेच भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद- आयसीएमआरच्या संयुक्त प्रयत्नातून स्थापित "झुनोसेस सेंटर" याप्रमाणे सर्पदंश लस निर्मितीसाठी "हाफकिन संशोधन संस्था, मुंबई" वगैरे संस्था वन्यजीव संपदा संरक्षित करण्याचे प्रयत्न करत आहेत. आजच्या तरुण पिढीने वन्यजीव संरक्षणासाठी पुढे सरसावणे गरजेचे आहे. समाज माध्यमांवर आपली तडफदार पर्यावरणवादी भूमिका मांडणारे युवा वन्यजीव शिक्षण, संशोधन, विस्तारकार्य, प्रशासन अशा विविधांगी भूमिकातून जोरकसपणे नेतृत्व करणे अपेक्षित आहे. आपल्या परिसरातील वन्यजीव संबंधी कार्यरत संशोधन, शैक्षणिक तथा समाजसेवी संस्थांशी जोडले जावे. वन्यजीव संपदा ही निसर्गातील विस्तृत परिसंस्थेतील महत्वाचा घटक असून वने, मानव यांचेशी सामायिकपणे जोडलेले असल्याने वन्यजीवांचे संरक्षण, हे पुढील काळातील मानवी अस्तित्वासाठी देखील तितकेच आवश्यक आहे.

मानवी अस्तित्व उत्क्रांतीच्या प्रवाहात आणि निसर्गाच्या कक्षेत उभे राहत असताना वन्यजीव संपदेने महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे. याची जाणीव आगामी काळात तेवढीच सुस्पष्ट असावी, या हेतूने हा दिवस जगभर "जागतिक वन्यप्राणी दिन" म्हणून साजरा केला जातो. सन १९७३च्या जागतिक संकटग्रस्त वन्य प्राणी आणि वनस्पतीच्या आंतरराष्ट्रीय व्यापार संबंधी परिषदेतील ठरावास संयुक्त राष्ट्रांनी स्वाक्षरी केल्याची आठवण म्हणून वर्ष २०१३पासून वन्यप्राण्यांच्या रक्षणासाठी कटिबद्धतेचे प्रतीक म्हणून जागतिक पातळीवर वन्यप्राणी दिन साजरा केला जातो. या निमित्ताने मानव वन्यजीव संघर्षांची किनार काही भागात गडद असताना नैसर्गिक परिसंस्थेच्या समतोल विकासासाठी संवर्धनाचे उपाययोजनाचे चिंतन केल्या जाते. वन्यजीव संरक्षणासाठी भागीदारी, ही सन २०२३ची मध्यवर्ती संकल्पना आहे. विविध कारणांनी मानवाकडून नैसर्गिक परिसंस्थेस हानी पोचविल्या जात आहे, ज्यामुळे वन्यजीव संपदा-प्राण्यांचे आणि वनस्पतीचे अस्तित्व धोक्यात येत आहे. जागतिक निसर्ग संरक्षण संघटनेने नोंदविलेल्या निरीक्षणानुसार आजमितीला सुमारे ८ हजार ४०० वन्यजीव प्रजाती या धोक्याच्या पातळीवर आहेत, तर सुमारे ३० हजार प्रजाती संकटग्रस्त होण्याच्या मार्गावर आहेत. निसर्गाचा समतोल हा केवळ वन्यजीवांसाठी गरजेचा नसून मानवी अस्तित्वासाठी देखील महत्वाचा ठरतो म्हणून वन्यजीव संपदेचे संवर्धन समजून घेणे आवश्यक आ हे .

!! जागतिक वन्यजीव दिनानिमित्त सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

**-संकलन व सुलेखन-**
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त मधुभाष-**
**७१३२७९६६८३**

# जीवे मारण्याच्या उद्देशाने केलेल्या गुन्ह्यामधून आरोपीची जामीन मंजूर - अ‍ॅड. सय्यद शफीक

**दैनिक वादळ वार्ता**

शहरातील जमजम कॉलोनी, चांदणी ग्राऊंड या भागात घरच्या कुटुंबिक प्रश्नांवरून वाद होऊन मोठ्या भांडनात रूपांतर झाले आणि आपल्याच नातेवाईकावर वर ३०७ सारख्या कलम लागल्या. त्या मध्ये अ‍ॅड. सय्यद शफीक व अ‍ॅड ए. जी. शेख यांनी मा . जिल्हा सत्र न्यायालय माजलगाव वर्ग १ यांच्या समोर आरोपीची बाजू मांडली व मा . जिल्हा सत्र न्यायालय माजलगाव वर्ग १ यांनी भा. द. वि. चे कलम ३०७ मधून आरोपीला जामीन मंजुर केली

सविस्तर माहिती अशी आहे की, फिर्यादी ने दिलेल्या माहिती नुसार फिर्यादी नामे शेख शाकिर शेख तय्यब वय(३०) यांची पत्नी काही कारणावरून फिर्यादी ला सोडून माहेरी गेली होती. आणि पत्नी ला आणण्यासाठी हे गेले व पत्नीला सांगितले तु माझ्या सोबत चाल तुला येव्याचे नसेत तर मला खुला देवून टाक असे बोललो होतो. त्यानंतर फिर्यादी च्या पत्नी ने आपल्या भावानां बोलावून घेतले त्या नंतर शिवीगाळ चा रूपांतर मोठ्या भांडणात झाले आणि एकाने आपल्या कमरेला असलेले चाकू फिर्यादीच्या उजव्या छातांच्या परगडीमध्ये चाकु खूपसुन काढला. या मध्ये पोलिस ठाणे माजलगाव शहर येथे २७/२०२३ कलम ३०७, ३२३, ५०४,५०६,३४ भादवि सह कलम ४/२५ भारतीय शस्त्र अधिनियम १९५९ याप्रमाणे गुन्हा दाखल झाला होता. त्या नतरव अ‍ॅड. सय्यद शफीक व अ‍ॅड ए. जी. शेख यांनी मा . जिल्हा सत्र न्यायालय माजलगाव वर्ग १ यांच्या समोर आरोपीची बाजू मांडली व त्यांच्यावर खोटा गंभीर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे तसेच गुन्हयाची खरी वस्तुस्थीती व कायदेशीर सर्व मुद्दयावर आरोपींच्या वतीने समाधान कारक युक्तीवाद करण्यात आला व मा.न्यायालयाने आरोपींच्या वतीने करण्यात आलेल्या युक्तीवादामध्ये प्रथम दर्शनी तथ्य असल्याने तो ग्राहय धरुन दिनांक २६/०२/२०२४ रोजी आरोपींचा सशर्त जामीन मंजुर केला.

# ज्ञानदीप विद्यालयामध्ये स्वयंशासन दिन उत्साहात संपन्न.



वादळवार्ता/किल्लेधारूर

धारूर येथील ज्ञानदीप प्राथमिक विद्यालयात स्वंयशासन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. दिवसभराचे सर्व व्यवस्थापन सातवी वर्गातील विद्यार्थ्यानी उत्कृष्ट पणे सांभाळले.

धारूर येथील ज्ञानदीप विद्यालयामध्ये स्वयंशासन दिन साजरा करण्यात आला. या दिनानिमित्त सातवी वर्गातील विद्यार्थ्यांनी सकाळी परिपाठापासून ते शाळा सुटेपर्यंतचे मुख्याध्यापक, शिक्षक ते सेवक पर्यंतच्या सर्व जबाबदाऱ्या पार पाडत सर्व नियोजन केले. सकाळी आल्यानंतर सर्व विद्यार्थ्यांनी दररोज प्रमाणे शालेय परिपाठाचे सादरीकरण केले तसेच सर्व विषयाच्या वर्गानुसार तासिका घेतल्या. या स्वयंशासन दिनाची मुख्याध्यापक म्हणून भूमी अतुल शिनगारे तर उपमुख्याध्यापक अथर्व सूर्यकांत जगताप व शाहिद जहीर शेख तसेच सेवक व इतर विद्यार्थ्यांनी शिक्षकाच्या जबाबदाऱ्या पार पाडल्या हा स्वयंशासन दिन यशस्वी होण्यासाठी विद्यालयातील शिक्षक रामराजा दराडे व अशोक अंडील यांनी नियोजन करत सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले. स्वयंशासन दिन उत्साही व आनंदी

# राज्यव्यापी कापूस सोयाबीन परिषदेसाठी मधुरा स्वामीनाथन उपस्थित राहणार : किसान सभा

**वादळवार्ता/बीड**\अखिल भारतीय किसान सभेच्या नेतृत्वाखाली बीड जिल्ह्यातील माजलगाव या ठिकाणी 'राज्यव्यापी कापूस, सोयाबीन उत्पादक शेतकरी परिषद' दिनांक ७ मार्च २०२४ रोजी भव्य आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेसाठी डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांच्या कन्या व शेती प्रश्नाच्या अभ्यासक डॉ. मधुरा स्वामीनाथन, अखिल भारतीय किसान सभेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अशोक ढवळे, डॉ. अजित नवले, कॉ. उमेश देशमुख हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती किसान सभा बीड जिल्हा कमिटीने दिली आहे. किसान सभेने आज शासकीय विश्रामगृह, बीड येथे पत्रकार परिषद आयोजित केली होती. याप्रसंगी किसान सभेचे जिल्हा अध्यक्ष ॲड. अजय बुरांडे, माकपचे ज्येष्ठ नेते पी. एस. घाडगे, किसान सभेचे जिल्हा सचिव मुरलीधर नागरगोजे, ऊसतोडणी कामगार नेते व डीवायएफआयचे जिल्हा अध्यक्ष मोहन जाधव, सिटूचे जिल्हा सचिव डॉ. अशोक थोरात, एसएफआयचे राज्य सचिव रोहिदास जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. केंद्र व राज्य सरकारच्या शेतकरीविरोधी व कॉर्पोरेट धार्जिण्या धोरणांमुळे शेतीमालाचे भाव सातत्याने पाडले जात आहेत. कापूस व सोयाबीनचे भाव अलीकडच्या काळात मोठ्या प्रमाणात कोसळल्यामुळे महाराष्ट्रभरातील शेतकरी हैराण झाले आहेत. केंद्र व राज्य सरकारकडे कापूस व सोयाबीनच्या रास्त भावासाठी हस्तक्षेप करण्याची वारंवार मागणी करूनही या मागणीकडे सातत्याने दुर्लक्ष केले जात आहे. ई.डी. व सी.बी.आय. चा गैरवापर करून विरोधी पक्षातील नेत्यांना जेरीस आणत पक्ष फोडणे व येऊ घातलेल्या निवडणुकांची तयारी करणे यापलीकडे कशातही लक्ष देण्याची सत्ताधारी शिंदे-फडणवीस-




अजित पवार सरकारची इच्छा नाही. राज्यात बहुतांशी परिमंडळामध्ये राज्य सरकारने दुष्काळ जाहीर केला, मात्र दुष्काळग्रस्त जनतेला अद्याप कोणतीही ठोस मदत करण्यात आलेली नाही. नैसर्गिक आपत्तीत नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना अग्रीमची रक्कम काही जिल्ह्यांमध्ये जाहीर झाली, मात्र बहुतांश ठिकाणी कंपन्यांनी शेतकऱ्यांच्या तोंडांना याबाबतही पाने पुसली. पीक कापणी प्रयोगानंतर देय असलेल्या नुकसानभरपाईबाबत सुद्धा पीक विमा कंपन्या चाल-ढकल करत आहेत आणि शेतकऱ्यांना भरपाई नाकारत आहेत. राज्य व केंद्र सरकार मात्र या सर्व प्रश्नांकडे अक्षम्य दुर्लक्ष करत आहेत. केंद्र सरकारने नुकताच डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांना भारतरत्न पुरस्कार जाहीर केला. डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांच्या लोकप्रियतेचा फायदा करून घेण्यासाठी एकीकडे पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान करायचा व त्यांनी शेतकऱ्यांना शेती संकटातून बाहेर काढण्यासाठी शेतीमालाला दीडपट हमीभाव देण्याच्या शिफारशीला व राष्ट्रीय शेतकरी आयोगाच्या इतर शिफारशींना मात्र गुंडाळून ठेवायचे. उलट डॉ. स्वामीनाथन यांनी सुचवलेल्या दीडपट हमीभावाच्या मागणीसाठी आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांवर ड्रोनने अश्रुधूराची फवारणी करत लाठीचार्ज आणि गोळीबार करायचा, असे दुटप्पी व निंदनीय धोरण भाजपचे सरकार राबवित आहे. कापूस व सोयाबीन परिषदेच्या निमित्ताने महाराष्ट्र भरातील शेतकरी बीड जिल्ह्यातील माजलगाव येथे एकवटणार असून शेती अरिष्टाची झळ पोहोचलेल्या मराठवाड्याचे केंद्र असलेल्या बीड येथून सरकारच्या धोरणांच्या विरोधात एक जबरदस्त शेतकरी एल्गार सुरू करणार आहेत. स्वामिनाथन आयोगाच्या शेतकरी हिताच्या शिफारसींची त्वरित अंमलबजावणी करा, टिकाऊ तसेच नाशवंत शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारित दीडपट किमान हमी भाव द्या, सोयाबीनला प्रति क्विंटल किमान ८ हजार रुपये हमीभाव द्या, कापसाला प्रति क्विंटल किमान १२ हजार रुपये हमीभाव द्या या मागण्या परिषदेच्या माध्यमातून करण्यात येणार आहेत. कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांनी या परिषदेला हजारोच्या संख्येने उपस्थित रहावे व शेतकरी एकजूट मजबूत करावी असे आवाहन किसान सभेच्या वतीने करण्यात येत आहे. पत्रकार परिषद यशस्वी करण्यासाठी सुहास जायभाये, सत्यजित मस्के, अनिल राठोड, शिवा चव्हाण, विष्णू गवळी, रमेश नाईकवाडे, अक्षय वाघमारे, आकाश कचरे, स्वप्नील तेलप आदींनी परिश्रम घेतले.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत दोघांचा मृत्यु...



वादळवार्ता/बीड

नवगण राजुरीहून पारगावकडे निघातलेल्या तरुणांच्या मोटारसायकलला अज्ञात वाहनाने जोराची धडक दिल्याने यामध्ये दोघे तरुण गंभीररित्या जखमी होऊन ठार झाल्याची घटना नवगण राजुरी परिसरातील देवराज हॉटेलच्या बाजुला रात्री घडली. शुभम महादेव डोके व बालाजी खेलबा चादर (रा. पारगाव ता. वाशी जि. धाराशीव) या तरुणाच्या मोटारसायकलला रात्री अज्ञात वाहनाने जोराची धडक दिली. या अपघातात दोघेजण गंभीररित्या जखमी होऊन ठार झाले आहेत. या प्रकरणी अज्ञात वाहन धारकाविरोधात बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# करुणा शर्मा उर्फ मुंडे यांच्या विरुद्ध दाखल झालेला अ‍ॅट्रॉसिटीचा व जीवे ठार मारण्याचा गुन्हा , केस माननीय उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ येथे रद्दबातल

**वादळवार्ता/छ.संभाजीनगर**

प्रस्तुत हकीगत अशी की, करुणा अशोक शर्मा उर्फ करुणा धनंजय मुंडे यांनी दिनांक ५ सप्टेंबर २०२१ रोजी परळी शहरांमध्ये येऊन नामदार धनंजय मुंडे यांच्या बद्दल पत्रकार परिषद घेणार असल्याची फेसबुक लाईव्ह वरून सांगितले होते त्यानुसार करुणा शर्मा उर्फ मुंडे या 5 सप्टेंबर या दिवशी परळी वैजनाथ येथील मंदिरामध्ये आल्या होत्या त्यावेळी फिर्यादी यांनी त्यांना व इतरांना जातीवाचक शिवीगाळ केली तसेच करुणा शर्मा उर्फ मुंडे यांनी धनंजय मुंडे व त्यांची पत्नी यांना देखील शिवीगाळ केली त्यावेळी फिर्यादी यांनी त्याचा जाब विचारला असता सौ करुणा शर्मा उर्फ मुंडे त्यांच्याबरोबर असलेला दुसरा आरोपी अरुण दत्तात्रय मोरे यांनी फिर्यादी व इतरांना धक्काबुक्की करून जातीवाचक शिवीगाळ व जीवे ठार मारण्याचा बाबतचा गुन्हा परळी शहर पोलीस स्टेशन जिल्हा बीड येथे त्याच दिवशी दाखल करण्यात आला होता व सदरच्या गुन्ह्यामध्ये सौ करुणा अशोक शर्मा उर्फ करुणा धनंजय मुंडे आणि अरुण दत्तात्रय मोरे यांच्याविरुद्ध प्रथम खबर क्रमांक १४२/२०२१ दाखल झाला व त्या गुन्ह्यामध्ये दोन्ही आरोपींना त्यादिवशी अटक करण्यात आली होती त्यानंतर दोन्ही आरोपी हे जामीनावर सुटलेले होते सदरच्या प्रकरणा मध्ये विभागीय पोलीस अधिकारी यांनी केसचा तपास करून दोषारोप पत्र माननिय विशेष तथा अप्पर सत्र न्यायालय आंबेजोगाई या ठिकाणी दाखल केले त्यानंतर करुणा शर्मा उर्फ मुंडे यांनी सदरचे एफ आय आर, दोषारोप पत्र रद्द करण्यासाठी माननीय उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद या ठिकाणी फौजदारी अर्ज दाखल केला सदरच्या केस मध्ये प्रतिवादींना बजावल्यानंतर सदरच्या प्रकरणांमध्ये मूळ फिर्यादी या वकिलामार्फत हजर झाल्या

सदरच्या प्रकरणांमध्ये सर्व कागदपत्र माननीय न्यायालया समोर आल्यानंतर सदरच्या प्रकरणाची अंतिम सुनावणी माननीय नामदार न्यायमूर्ती मंगेश एस. पाटील व माननीय नामदार न्यायमूर्ती शैलेश पी. ब्रह्मे यांच्या खंडपीठा समोर दिनांक १५/०२/२०२४ रोजी घेण्यात आली सदरच्या सुनावणी मध्ये करुणा शर्मा उर्फ मुंडे यांच्यातर्फे ॲड. संदीप आंधळे व कल्याण खोले पाटील यांनी युक्तिवाद करताना माननीय न्यायालयाच्या असे निदर्शनास आणून दिले की, सदरच्या प्रकरणांमध्ये आरोपी करुणा अशोक शर्मा उर्फ करुणा धनंजय मुंडे या पहिल्याच वेळी परळी या ठिकाणी गेल्या होत्या व फिर्यादी स्वतः सांगतात की, आरोपी करुणा शर्मा उर्फ करुणा मुंडे यांना त्या ओळखत नाहीत जर फिर्यादी हे आरोपीला ओळखत नाही आणि आरोपीही फिर्यादीला ओळखत नाही त्यावेळी फिर्यादी यांची जात आणि धर्म आरोपीला माहीत असलेला कोणताही पुरावा दोषारोप पत्राबरोबर नाही याबरोबरच आरोपी यांच्या विरुद्ध दाखल केलेला गुन्हा हा राजकीय दोषाने प्रेरित असून कोण्या एका मंत्राच्या सांगण्यावरून फिर्यादी यांनी आरोपी करुणा शर्मा उर्फ मुंडे यांच्या विरुद्ध कट कारस्थान रचून दाखल केलेला दिसून येतो याबरोबरच दुसरा जो आरोपी आहे तोही हे प्रकरण दाखल झाल्यानंतर काही दिवसातच मयत झाला त्यामुळे आरोपी विरुद्ध दाखल करण्यात आलेला आयपीसी कलम ३०७ चा गुन्हा सुद्धा होत नाही तसेच याबरोबरच महत्त्वाचे असलेले त्यावेळचे साक्षीदार यांचाही जबाब नोंदवलेला नाही आणि माननीय न्यायालयाच्या असेही निदर्शनास आणून दिले की गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपी यांना त्यादिवशी अटक करण्यात आली व त्या दिवशी उपविभागीय पोलीस अधिकारी विभाग आंबेजोगाई यांनी आरोपी सौ करुणा शर्मा उर्फ मुंडे यांच्या सांताक्रुज वेस्ट मुंबई या ठिकाणी असलेल्याच्या फ्लॅट ची घरझडती बाबत ही वरिष्ठांना व संबंधित पोलीस स्टेशनला पत्र व्यवहार केला होता व त्यानंतर उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी आरोपी



करुणा शर्मा उर्फ मुंडे यांच्या सांताक्रुज वेस्ट मुंबई येथील फ्लॅटची झडती घेतली व त्या मधून करुणा शर्मा हे वापरत असलेले लॅपटॉप व इतर साहित्य हे जप्त करण्यात आले याबाबत माननीय न्यायालयाच्या असे निर्देशन आणून दिले की सदरचा गुन्हा हा परळी वैजनाथ या ठिकाणी झाला व उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी मुंबई येथील घर झडती घेऊन करुणा शर्मा उर्फ मुंडे यांचे महत्त्वाचे असलेले कागदपत्र व लॅपटॉप व हार्ड डिस्क डाटा हा जप्त केला तसेच असाही युक्तिवाद करण्यात आला की जर गुन्हा परळी या ठिकाणी होत असेल आणि आरोपींच्या मुंबई या ठिकाणी जाऊन घर चढती घेऊन तेथील असलेले लॅपटॉप मोबाईल हँडसेट पेन ड्राईव्ह व इतर साहित्य जप्त करण्याचा कोणतेही कारण नाही तरीही उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी सर्व खोटा तपास केलेला आहे. त्यामुळे आरोपी यांचा कोणताही संबंध नसताना खोटा अ‍ॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करून खोटा तपास करून व आरोपी विरुद्ध खोटे दोषारोप दाखल केलेला आहे व त्यामुळे आरोपी विरुद्ध दाखल असलेला एफ आय आर, दोषारोप पत्र आणि असलेली स्पेशल केस रद्द करावी अशी विनंती मान्य न्यायालयासमोर केली. यावेळी सरकारी वकील व फिर्यादी यांचे वकिलामार्फत सदरचा गुन्हा रद्द करू नका व दोषारोप पत्र दाखल झालेले आहे त्यामुळे हा गुन्हा रद्द करू नका म्हणून विनंती करण्यात आली परंतु सदरचे प्रकरण हे अंतिम निर्णयासाठी राखून ठेवण्यात आले व सदरच्या प्रकरणाचा निकाल हा १ मार्च २०२४ रोजी खुल्या न्यायालयीन कक्षेमध्ये सांगण्यात आला व त्यावेळी माननीय न्यायमूर्ती साहेबांनी आरोपी सौ करुणा धनंजय मुंडे अशोक शर्मा उर्फ करुणा धनंजय मुंडे यांनी दाखल केलेले फौजदारी अर्ज मंजूर करून त्यांच्याविरुद्ध दाखल असलेला एफ आय आर दोषारोपपत्र व स्पेशल केस ही रद्द केलेली आहे. सदरच्या केस मध्ये सौ करुणा अशोक शर्मा उर्फ करुणा धनंजय मुंडे यांच्यातर्फे अ‍ॅड. संदीप आंधळे यांनी युक्तिवाद केला तसेच या प्रकरणांमध्ये त्यांना अ‍ॅड. कल्याण खोले पाटील व ॲड.बी.आर साबळे यांनी सहकार्य केले.

# ज्येष्ठ नागरिक सामाजिक संस्था तर्फे नवनियुक्त सरपंच अजय म्हात्रे यांचा सत्कार.

दैनिक वादळ वार्ता
उरण/विठ्ठल ममताबादे

उरण तालुक्यातील चाणजे ग्रामपंचायतच्या



सरपंच पदी ग्रामपंचायत सदस्य तथा सामाजिक कार्यकर्ते अजय म्हात्रे यांची निवड झाली आहे या निवडीमुळे सर्वत्र आनंदाचे वातावरण आहे. या निवडीबद्दल जेष्ठ नागरिक सामाजिक संस्थेतर्फे त्यांच्या सत्कार करण्यात आला. संस्थेचे संस्थापक राजेंद्र घरत,उपाध्यक्ष रामकृष्ण म्हात्रे,खजिनदार विजय गाडे,सहखजिनदार धनाजी सोनकर, सचिव अशोक थळी, सहसचिव प्रकाश म्हात्रे व कार्यकारी मंडळाचे सदस्य यावेळी उपस्थित होते. या सर्वांनी सरपंच अजय म्हात्रे यांना पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी जेष्ठ नागरिक सामाजिक संस्था करंजा तर्फे नवनियुक्त चाणजे ग्रामपंचायतचे सरपंच अजय म्हात्रे यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# टँकरवाले नगरपरिषदेतील पिण्याच्या पाण्याच्या टँकीतून पाणी सर्रासपणे विकू लागले

## नगर परिषदेतील अधिकारी कर्मचाऱ्यांचे दुर्लक्ष-प्रेम कांबळे

वादळवार्ता/बीड

बीड शहरातील धानोरा रोड येथील नगर परिषदेच्या पिण्याच्या पाण्याच्या टाकीतून सर्रासपणे पाणी विकू लागले आहेत बीडकरांना उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये दहा ते बारा दिवसांना पाणी सोडले जाते आणि पाण्याच्या टाकी वरती राजरोसपणे सर्रास पाण्याची विक्री त्या ठिकाणी असलेल्या कर्मचाऱ्याद्वारे होत आहे या संदर्भाची माहिती बीड नगरपालिका मुख्य अधिकारी नीता अंधारे यांना व पाणीपुरवठा इंजिनिअर राहुल टाळके यांना पुराव्यानिशी देण्यात आलेले



आहे या आधी पाणीपुरवठा इन्चार्ज किसन हाडोळे यांच्याकडे वारंवार तक्रार करून देखील दखल घेतलेली नाही तरी याची तात्काळ दखल बीड नगरपालिकेच्या मुख्याधिकारी नीता अंधारे व पाणीपुरवठा इंजिनिअर राहुल टाळके यांनी घ्यावी दकल न घेतल्यास पँथर स्टाईलने उत्तर देण्यात येईल असा इशारा ऑल इंडिया पँथर सेनेचे बीड शहर अध्यक्ष प्रेम कांबळे यांनी दिला आहे बीड जिल्ह्यात दुष्काळाची सावट दिसू लागले असून पिण्यासाठी भटकंती करण्याची वेळ सध्या नागरिकावर येऊ लागले आहे अशातच प्रायव्हेट टँकर वाले हे नगर परिषदेच्या पिण्याच्या पाण्याच्या टाकीवरून पाणी घेऊन जात ते लोकांना विकत असल्याचे चित्र सध्या दिसत आहे नागरिकांना १०-१० दिवस पण येत नाही व हे प्रायव्हेट टँकर वाले तिथूनच पाणी घेऊन जात असल्याचे समोर येत आहे यावर नगरपरिषद अधिकारी व कर्मचाऱ्यांनी लक्ष देण्याची गरज आहे.

दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव दैनिक

# वादळ वार्ता

संपादक ; अजय भांगे मो. ९४२२६६००७७

# अंबाजोगाई येथिल अमलेश्वर मंदिर जतन व दुरुस्ती साठी ८ कोटी ७७ लक्ष रुपयांचा निधी मंजूर

## आ.नामितातार्ई मुंदडा यांच्या प्रयत्नांना यश



**वादळवार्ता/अंबाजोगाई**
अंबाजोगाई शहराच्या ऐतिहासिक आणि धार्मिक भावनांशी जोडल्या गेलेल्या अमलेश्वर मंदिर या राज्य संरक्षित स्मारकाच्या जतन व दुरुस्तीसाठी राज्य शासनाच्या वतीने ८ कोटी ७७ लक्ष ५५ हजार ८३४ रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने दि. १ मार्च २०२४ अन्वये हे आदेश काढण्यात आले आहेत. सदरील आदेशात पुढे असे म्हटले आहे की, मंत्रीमंडळाची विशेष बैठक छत्रपती संभाजीनगर येथे दि. १६.०९.२०२१ रोजी पार पडली होती. त्यामध्ये घेण्यात आलेल्या निर्णयामध्ये मराठवाडा विभागातील ऐतिहासिक वास्तुंचे संवर्धन करण्याचा समावेश करण्यात आला असून विशेषतः त्यामध्ये अंबाजोगाई येथील प्राचीन वास्तुस्थळाचा विकास करण्याबाबत घोषणा करण्यात आली आहे. मा. मंत्रीमंडळ बैठकीत झालेल्या निर्णयानुसार अंबाजोगाई येथील अमलेश्वर मंदिराचे जतन व दुरुस्ती कामासाठी ८,७७,५५,८३४ रुपये रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत उपनिर्दिष्ट पत्रान्वये संचालक पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय विनंती केली आहे, या स्मारकाचे अंदाजपत्रक सन २०२२-२३ ची राज्य दरसूची व स्थानिक बाजारभावानुसार तसेच पुरातत्व संकेतानुसार तयार करण्यात आलेले आहे. त्यानुसार या राज्य संरक्षित स्मारकाच्या जतन व दुरूस्ती कामासाठी रु.८,७७,५५,८३४ इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सदरील शासन निर्णयान्वये अंबाजोगाई येथिल अमलेश्वर मंदीरासाठी राज्य संरक्षित स्मारकाच्या जतन व दुरूस्तीकामाच्या रू.८,७७,५५,८३४/- इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.



सदरील प्रशासकीय मान्यतेनुसार निविदा प्रक्रिया पूर्ण करुन याप्रकरणी न्युनत्तम निविदेचा प्रस्ताव तसेच खर्चास वित्तीय मान्यतेचा प्रस्ताव शासनास सादर केल्यानंतर प्रस्तावित खर्चास वित्तीय मान्यता देण्यात येईल. या साठी होणारा खर्च मागणी क्र. झेडडी-२, १०३, पुरातत्वशास्त्र, (०१) (०६) राज्यातील ऐतिहासिक व सांकृतिक दृष्ट्या महत्वाचे किल्ले व धार्मिक स्थळे यांची जपणूक व संरक्षण कार्यक्रम २२०५-१३०२ २७ लहान बांधकामे या लेखाशिर्षात त्या त्या वर्षी उपलब्ध होणाऱ्या तरतूदीतून भागविण्यात यावा. असे या आदेशात म्हटले आहे. सदरील शासनर्णय हा महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने निगर्मित करण्यात आला असून या आदेशावर महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाचे उपसचीव नंदा मारोती राऊत यांची स्वाक्षरी आहे. अंबाजोगाई शहराच्या धार्मिक, पौराणिक आणि ऐतिहासिक परंपरेशी जोडल्या गेलेल्या या अमलेश्वर मंदिर राज्य संरक्षित स्मारक जतन व दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करून घेण्यासाठी आ. नमिता मुंदडा यांनी विशेष प्रयत्न केले आहेत.

## आज पासून श्री क्षेत्र सिद्धेश्वर संस्थानच्या महाशिवरात्री सप्ताहाला आजपासून प्रारंभ

वादळवार्ता/शिरूरकासार
शिरुर कासार तालुक्यातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री क्षेत्र सिद्धेश्वर संस्थानच्या अखंड हरिनाम सप्ताहाला आजपासून प्रारंभ होणार आहे.सप्ताहाची तयारी पूर्ण झाली असून शिरूरकासार शहरासह पंचक्रोशीतील भाविकांच्या स्वागतासाठी धाकटी अलंकापुरी सजली आहे.शिरूर कासार शहरासह पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी सप्ताह सोहळ्याचा मोठ्या संख्येने लाभ घेण्याचे आवाहन महंत वेदांताचार्य स्वामी विवेकानंद शास्त्री यांनी केलेआहे. वै.प्रातस्मरणीय ह.भ.प आबादेव महाराज यांनी प्रारंभ केलेला महाशिवरात्रीचा सप्ताह सोहळा तालुक्यातील भाविकांसाठी अध्यात्मिक मेजवानी देणारा असतो.शिवाय या सप्ताहाच्या माध्यमातुन उपस्थित भाविकांना वर्षभर पुरेल एवढी ऊर्जा मिळत असते. त्या ऊर्जेच्या जोरावर परिसराची अध्यात्मिक श्रीमंती कायम दिसून येते.दोन मार्च ते नऊ मार्च दरम्यान संपन्न होणाऱ्या सप्ताह सोहळ्यात विविध धार्मिक आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.





दैनंदिन कार्यक्रमात पहाटे काकडा,पूजा, विष्णुसहस्त्रनाम,ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायणसह गाथा भजन, प्रवचन, हरिपाठ,कीर्तन आणि जागर असे कार्यक्रम होणार आहेत. मंदिराच्या भौगोलिक विकासासाठी लकी ड्रॉ चे आयोजन करण्यात आले असून शंभर रुपये दराने कूपन विक्री ठेवण्यात आली आहे.नऊ तारखेला समाप्ती दिवशी सायंकाळी पाच वाजता या लकी ड्रॉची सोडत महंत स्वामी विवेकानंद शास्त्री यांच्या हस्ते करण्यात येवुन भाग्यवान विजेत्यांना बक्षीसांचे वितरण करण्यात येणार आहे.सप्ताह सोहळ्यासाठी येणाऱ्या भाविकांची संस्थानवर भोजनाची व्यवस्था करण्यात आली असून महाप्रसादाचे यजमान अनिल गाडेकर,सतिश गाडेकर आणि अरुण बप्पाजी भांडेकर हे आहेत. श्री क्षेत्र सिद्धेश्वर संस्थानवर आठ दिवस होणाऱ्या सर्व कार्यक्रमांचा लाभ घेण्याचे आवाहन महंत स्वामी विवेकानंद शास्त्री यांनी केले आहे.

**राज्यातील नामवंत किर्तनकारांची हजेरी**
सप्ताह सोहळ्यात राज्यातील गुणवंत आणि नामवंत किर्तनकारांची हजेरी लागणार आहे.भाविकांना सिद्धेश्वर संस्थानच्या महाशिवरात्री सप्ताह सोहळ्यात किर्तनकारांच्या किर्तनाची गोडी लागलेली असते म्हणुन महंत स्वामी विवेकानंद शास्त्री दरवर्षी राज्यातील दिग्गज किर्तनकारांच्या किर्तनांचे आयोजन करत असतात.

**संस्थानच्या सर्वांगीण विकासासाठी राजकीय नेत्यांची उपस्थिती**
काल्याच्या दिवशी जिल्हयातील सर्वच पक्षांचे प्रमुख पदाधिकारी सोहळ्याला आवर्जून उपस्थिती लावतात.आपल्या शुभेच्छापर मनोगतात ते संस्थानच्या सर्वांगीण विकासकामांसाठी मोठया प्रमाणावर निधीची घोषणा करतात.गेल्या अनेक वर्षांपासून हि परंपरा सुरु असून महंत स्वामी विवेकानंद शास्त्री यांनी त्या निधीच्या जोरावर संस्थान परिसरात मोठ्या प्रमाणावर विकासकामे केली आहेत.

## सौंदना ग्रामस्थांचा सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालय व पंचायत समिती कार्यालयावर हंडा मोर्चा-गायके राजू




वादळवार्ता/बीड
बीड तालुक्यातील सौंदाना ता.जि.बीड येथे दुष्काळाच्या झळा जानेवारी महिन्यातच बसल्या आहेत, या भागामध्ये खूप पावसाचे प्रमाण कमी असल्यामुळे डिसेंबर आणि जानेवारीच्या पहिल्या आठवड्यातच विहिरींनी आणि बोर यांनी तळ गाठला आहे म्हणून जनावरांना व माणसांना पिण्यासाठी पाणी नाही, गावातील महिला व नागरिक पिण्याच्या पाण्यासाठी दिवसभर वण-वण करून चार हांडे सुद्धा मिळत नाहीत, म्हणून ग्रामसेवक व सरपंच यांना जानेवारी महिन्यातच गावातील महिला ग्रामस्थांनी निवेदन देऊन सुद्धा आजपर्यंत गावाला पाण्याच्या पिण्याच्या टँकरची सोय झाली नाही. सौंदाना ता.जी. बीड येथे दि.२५ जानेवारी रोजी विशेष महिला ग्रामसभा घेऊन सुद्धा गावकऱ्यांच्या मागणीला यश आले नाही म्हणून आज रोजी २९ फेब्रुवारी रोजी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्री राजू गायके व सामाजिक कार्यकर्ते युवराज गायके यांनी मा.जिल्हाधिकारी साहेब बीड, गट विकास अधिकारी पंचायत समिती बीड, मा.तहसीलदार साहेब बीड, मा. पोलीस अधीक्षक साहेब बीड, मा. कार्यकारी अधिकारी साहेब जिल्हा परिषद बीड, मा.मंडळ अधिकारी साहेब बीड अशा सर्व कार्यालयांना रितसर निवेदन देण्यात आले आहे. शुक्रवार, शनिवार आणि रविवार या तीन दिवसात पाण्याची सोय प्रशासनाने करावी नसता दि. ४ मार्च रोजी श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय व तसेच पंचायत समिती गट विकास अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये हंडा मोर्चा काढून आंदोलन करण्यात येईल याची नोंद घ्यावी जर काही अनर्थ घडला तर याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील असे जाहीर पत्रक श्री राजू गायके स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष बीड, युवराज गायके व सौंदाना येथील ग्रामस्थांनी कळवले आहे.

## धारूर येथील यशोदीप पब्लिक स्कुलचे आज वार्षीक स्नेहसंमेलन.

वादळवार्ता/किल्लेधारूर
धारूर येथील यशोदीप पब्लिक स्कुल चे वार्षीक स्नेहसंमेलन दि. २ मार्च रोजी आयोजित करण्यात आले असून याचे उद्घाटन धारूर पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे यांचे हस्ते होणार असून यावेळी प्रमूख पाहूणे म्हणूण गटशिक्षणाधीकारी गणेश गिरी ,शिक्षण विस्तार अधिकारी शिवाजी अंडील, केंद्रप्रमूख सय्यद हाकिम ,अभियंता संतोषसिंह दुबे, जेष्ठ पत्रकार अनिल महाजन, किल्लेधारूर युथ क्लबचे अध्यक्ष अभयसिंह चौव्हान ,सेवानिवृत्त मुख्याध्यापक अभिमन्यू पुजदेकर हे उपस्थित राहणार आहेत. यावेळी बाल विद्यार्थ्यांचे सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून पालक व नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन संस्थेचे प्रमूख विशालसिंह दिख्खत यांनी केले आहे.

## जिल्हास्तरीय दिव्यांग मुला मुलींच्या क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न

बीड प्रतिनिधी: दिनांक 22 व 23 फेब्रुवारी 2024 छत्रपती शिवाजी क्रीडा संकुल बीड येथे संपन्न झाल्या यामध्ये अनिवासी मूकबधिर विद्यालय पांगरी रोड बीड येथील विद्यार्थी लहू अनिल ननवरे याने लांब उडी मध्ये जिल्हास्तरीय प्रथम क्रमांक पटकावला या यशाबद्दल समाज कल्याण विभाग बीड चे आयुक्त श्रीमान रवींद्रजी शिंदे साहेब तसेच माननीय श्रीमान नखाते या दोन दिवशीय कार्यक्रमासाठी जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे ,पाटील साहेब उपमुख्य कार्यकारी अधिकारी संगीता मॅडम तसेच दिव्यांग आयुक्त उपाध्यक्ष डॉक्टर संतोषजी मुंडे साहेब यांच्या उपस्थितीत दोन दिवशीय




दिव्यांगाच्या क्रीडा स्पर्धेचा कार्यक्रम संपन्न झाला यामध्ये बीड जिल्ह्यातील एकूण दिव्यांगाच्या 40 शाळेने सहभाग घेतला होता त्यामध्ये अनिवासी मूकबधिर विद्यालय पांगरी रोड बीड प्रभारी मुख्याध्यापक जगन्नाथ चव्हाण क्रीडा शिक्षक आकुसकर सोमनाथ यांनी परिश्रम घेतले व व निवासी विद्यालयाचे मुख्याध्यापक शिंदे सर रसाळ सर येवले सर डोंगरे सर राठोड मॅडम अहिल्या मातकर मॅडम भागवत कापरे सर श्याम उनवणे सर प्रमोद शिंदे सर पोकळे सर सावंत सर चव्हाण आधी शिक्षकांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या

# अंबाजोगाई आणि स्वाराती वैद्यकीय महाविद्यालयाने दिलेला स्नेह विसरणे अशक्य

## सेवापुर्ती समारोहात अधिष्ठाता डॉ.भास्कर यांचे मत

**वादळवार्ता/अंबाजोगाई**
आपल्या ३४ वर्षाच्या प्रदीर्घ शासकीय सेवा काळात अंबाजोगाई शहरातील माणसांनी आणि स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी दिलेले प्रेम विसरणे शक्य नाही असे मत स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. भास्कर खैरे यांनी सेवापुर्ती निमित्ताने आयोजित गौरव सोहळ्यात बोलताना व्यक्त केले. वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिसेविका कार्यालय परिसरातील सभागृहात अधिष्ठाता डॉ. भास्कर खैरे यांच्या सेवापुर्ती निमित्ताने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नांदेड येथील पद्मश्री डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख होते. व्यासपीठावर हिंगोली शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. चक्रधर मुगल, डॉ. भास्कर खैरे यांच्या सुविध्द पत्नी तथा औरंगाबाद येथील बालरोग विभाग प्रमुख डॉ. प्रभा खैरे, महाविद्यालयाचे सर्व विभाग प्रमुख व इतर मान्यवर उपस्थित होते.

आपल्या विस्तारीत मनोगतात बोलताना अधिष्ठाता डॉ. भास्कर खैरे पुढे म्हणाले की, माझ्या एकुण ३४ वर्षाच्या शासकीय सेवा काळापैकी जवळपास २० वर्षांचा सेवाकाळ हा अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयात विविध पदांवर काम करतांना गेला आहे. वैद्यकीय पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केल्यानंतर १९९३ मध्ये आपण सहयोगी प्राध्यापक म्हणून येथे रुजू झालो आणि विभागप्रमुख व अधिष्ठाता पदापर्यंत काम करण्याची संधी मिळाली. शासकीय सेवेत काम करतांना अंबाजोगाई शहरातील माणसांनी आणि स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाच्या कर्मचाऱ्यांनी मला जे प्रेम दिले, माझ्यावर जो विश्वास



दर्शवला तो विसरणे अशक्य असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रारंभी डॉ. भास्कर खैरे यांचा विस्तृत असा परिचय नेत्र विभागातील सहयोगी प्राध्यापक डॉ. एकनाथ शेळके यांनी करुन दिला. आपल्या परिचयात डॉ. शेळके यांनी डॉ. भास्कर खैरे यांच्या अनेक बाबींना स्पर्श करीत त्यांच्या वेगवेगळ्या पैलुंची माहिती दिली.

यावेळी कर्मचारी संघटनेचे प्रतिनिधी, कास्ट्राइब कर्मचारी प्रतिनिधी,डॉ. बावळे, सहकारी पतसंस्था, परिचारिका फेडरेशन, परिचारिका प्रशिक्षण महाविद्यालय, महाविद्यालयाच्या विविध विभागांच्या वतीने शाल, सन्मान पत्र, स्मृतीचिन्ह भेटवस्तू, बुके, हार देवून सत्कार करण्यात आला. तर डॉ. सिध्देश्वर बिराजदार, डॉ. राकेश जाधव, डॉ. विश्वजित पवार, डॉ. शंकर धपाटे, डॉ. मुकुंद मोगरीकर, अधिसेविका कुरतडकर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना अधिष्ठाता डॉ. भास्कर खैरे यांच्या कार्याचा गौरव करुन त्यांना सेवापुर्तीच्या व भावी उज्वल आरोग्य, आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

आपल्या अध्यक्षीय समारोप पद्मश्री डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.सुधीर देशमुख यांनी अधिष्ठाता डॉ. भास्कर खैरे यांनी केलेल्या कामाची प्रशंसा करीत एकाच कॅम्प मध्ये ३,३०० नेत्र शस्त्रक्रिया करण्याचा विक्रम डॉ. भास्कर खैरे यांनी अंबाजोगाई येथील कै. डॉ. विमलताई मुंदडा यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित नेत्र शस्त्रक्रिया शिबिरात केला असल्याची आठवण करून देवून प्रशासकीय कामकाज करण्याच्या त्यांच्या विशिष्ट कार्यपद्धतीची प्रशंसा केली. या कार्यक्रमास औरंगाबाद, लातुर, नांदेड, हिंगोली, धाराशिव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात कार्यरत असलेले विविध विभागप्रमुख,स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाच्या सर्व विभागांचे प्रमुख, प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, प्रशासकीय अधिकारी, परिचारिका, विद्यार्थी, सर्व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विनोद वेदपाठक यांनी केले तर आभार रुग्णालय विभागाचे अधिक्षक डॉ. राकेश जाधव यांनी मानले.

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मुद्रक ग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथून डिजिटल छापून संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथून त्यांच्या ऑफिस वरुन बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरुपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )